**नि.फौ.ख.क्र. ४८/२०१६**
सरकार – वि.- राजु पवार
**निशाणी क्र. २५**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – सर्जेराव सखाराम शिंदे - तपास अधिकारी
वय – ६४ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त - पोलीस उप.निरीक्षक,
सध्या रा. - देहुरोड, पुणे.

**फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यु. पी. ठाकरे यांचे मार्फत सुरु-**

सन २०१६ साली मी पोलीस उप.निरीक्षक या पदावर लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे कार्यरत होतो. संदीप आडे नावाच्या व्यक्तीने फिर्याद दिलेली होती. घटना दि. २५/०४/२०१६ रोजी संध्याकाळी ०८.३० च्या सुमारास घडली होती. आरोपीने चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीच्या ताब्यातील २००/- रुपये लुटले होते. फिर्याद पाटोळे यांनी नोंदवुन घेतली होती. ते माझे सहकारी होते. त्यांची सही मी ओळखतो. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर पाटोळे यांची स्वाक्षरी आहे ती मी ओळखतो. फिर्यादीस **नि.क्र. २६** देण्यात येतो. फिर्यादीवरुन गुन्हा क्र. १२०/२०१६ कलम ३९२ भा.दं.वि, कलम ३७ शस्त्र कायदा व कलम १३७ महाराष्ट्र पोलीस कायदा नोंदवण्यात आला होता. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. त्यावर पाटोळे यांची स्वाक्षरी आहे ती मी ओळखतो. त्यास **नि.क्र. २७** देण्यात येतो.

२. दि. २६/०४/२०१६ रोजी पाटोळे यांनी मुददेमाल जप्ती व अटक पंचनामा तयार केला होता. तो दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला **नि.क्र. २०** व **नि.क्र. २१** वरील जप्ती व अटक पंचनामा दाखवण्यात आले. ते तेच आहेत. वरीष्ठांच्या आदेशान्वये उर्वरीत तपास माझेकडे देण्यात आला होता. मी सर्व कागदपत्र पाटोळे यांचेकडुन मिळवले होते. मी लागलीच आरोपीला घेवुन लोणी स्टेशन येथे जावुन घटनास्थळाचा पंचनामा केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २८** देण्यात येतो. त्यानंतर मी छापील जप्ती पंचनामा फॉर्म व मुददेमाल पावती तयार केली होती. ते दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरील फॉर्म व मुददेमाल पावती दाखवण्यात आली. ते तेच आहेत. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास अनुक्रमे **नि.क्र. २९ व नि.क्र. ३०** देण्यात येतो. मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले.

तपासात हे निष्पन्न झाले की, आरोपीने प्रस्तुतचा गुन्हा केलेला आहे. आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**(सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी प्लॅस्टीकच्या पाकीटामध्ये ठेवलेला जप्त मुददेमाल साक्षीदारास दाखवण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

३. आता मला मुददेमाल क्र. ४०/२०१६ मधील जप्त चाकु व २००/- रुपये दाखवण्यात आले. ते तेच आहेत. चाकुला **आर्टिकल अ** व रोख रक्कम २००/- **(१००/- रुपये चलनाच्या २ नोटा)** यास एकत्रीत **आर्टिकल ब** संबोधण्यात येते.

**सरतपास पुर्ण .**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.08.06 15:52:04 +0530

दि. ०६/०८/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.